॥ चला रांगोळ्या घालुया ॥

गायिकाः सुमन कल्याणपूर
गीतः अशोक जी. परांजपे
संगीतः अशोक पत्की

दशदिशा उजळल्या आली दीपावली
चला रांगोळ्या घालुया, भली पहांट ग झाली ॥ धृ. ॥
वसुबारस जाहले, धनत्रयोदशी सरली
स्नान अभ्यंग सकाळी, मुलेबाळें पहा नटली
पाने केळिची मांडली, वत्सलता डोळा भरली ॥ १ ॥

घराघरातुन प्रकाशती ग दिवे चंद्रज्योती
आज हा मंगलदिन सांगती
संध्यासमयी लक्ष्मी येई, घेऊनी शांती माझ्या धामी
इथे कुडीला लाभो देवा, मोक्षसंपदा ती ॥ २ ॥

इथे पाडवा रंगतो, रूप डोळ्यांना दावितो
पती हृदयांतरी दिसला
दारी उभ्या सुवासिनी भारी नेसुनी पैठणी
प्रीत मनामनामधे फुलली ॥ ३ ॥

आज अंबरी चंद्र हांसतो भगिनी ग यामिनी
बीज ही भावाची, साजणी
येईल आता भाऊराया बहिणीची ही भोळी माया
निरांजन लावियले लोचनी ॥ ४ ॥

कुडीः झोपडी, मानव शरीर
यामिनीः रात्र
बीजः महिन्याचा दुसरा दिवस